# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अव्यवहार्य संकल्पना...!

प्रत्येक शैक्षणिक धोरणाला राजकीय भूमिका असतात त्या प्रथम समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात उच्च शिक्षणाच्या संदर्भात प्रामुख्याने उच्च शिक्षण संस्थांचे बळकटीकरण, बहुविद्याशाखीय शिक्षण (लिबरल शिक्षण), स्वायतत्ता, व्यावसायिक शिक्षण, नवीन संस्थागत ढाचा, नॅशनल रिसर्च फाउंडेशन (छ्ठ्ऋ), टीचर्स ट्रेनिंग, नवीन परीक्षा व ऑनलाईन शिक्षण या संबंधी आहे.

भारतातील शिक्षणाचा व्यापक व अद्ययावत रूप देण्याचा प्रयत्न श्री राजीव गांधी सरकारने १९८६ साली केला. १९८६ च्या धोरणातील आजच्या नव्या शैक्षणिक धोरणात अनेक मुद्दे जसेच्या तसे आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. १९६६ साली कोठारी आयोगाने शिक्षणावर सहा टक्के खर्चाची केलेली शिफारस, त्यानंतर ५४ वर्षांनी पुन्हा तीच शिफारस नव्या धोरणात म्हणजे शिफारसींचा सुवर्णमहोत्सव म्हणायला काही हरकत नाही.

प्राचीन शिक्षण पद्धतीचे दाखले देऊन हे बहुविद्याशाखीय शिक्षण आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेसोबत जोडण्यात आले (धोरणात लिबरल शिक्षणाचा अर्थ). अभ्यासक्रमातील लवचिकता, वेगवेगळ्या अभ्यासक्रमाचे मिश्रण याच अंगाने बघण्यात आले आहे. शिक्षणातील बहुप्रवेश द्वारे विविध अभ्यासक्रम व विषय निवडण्याची संधी आणि विविध पर्याय या गोष्टीवर अधिक भर देण्यात आला. म्हणजे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र सह कीर्तनशास्त्र, योग्यशास्त्र, पाककला, फॅशन डिझायनिंग, संगणकशास्त्र, इतिहास, भोगोल ह्या पैकी कोणतेही विषय घेऊन विद्यार्थी आपले पदवी पूर्ण करू शकतो. म्हणजे कुठल्याही एका विद्याशाखेत विद्यार्थी पारंगत न होता, एका विषयात प्राविण्य न मिळू देता व लवकरच शिक्षणातून बाहेर निघण्याचे मार्ग मोकळे करणारे ह्या बहुविद्याशाखीय द्वारा ठरतील. हि लिबरल शिक्षण पद्धती अशी तयार करण्यात आली कि ती शिक्षणातील हद्दपारी यापुढे कायदेशीर व न्यायपूर्ण सिद्ध करणारी ठरू शकते. या बहुविद्याशाखीय शिक्षणाचा उद्देश फक्त विद्यार्थाला कौशल्य घडवून भांडवली बाजारात अर्धकौशल्यातून स्वस्त सेवा देणारा घटक निर्माण करण्याचा आहे का?

राष्ट्रीय शिक्षण धोरणात यापुढे पदवी अभ्यासक्रम हे चार वर्षाचे राहणार या चार वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याने एक वर्ष पूर्ण करून बाहेर पडल्यास प्रमाणपत्र कोर्स म्हणून त्या कोर्स ची ओळख राहील. दोन वर्ष पूर्ण करून बाहेर पडल्यास डिप्लोमा मिळेल. तीन वर्ष पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला डिग्री / पदवी व चार वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला ऍडव्हान्स पदवी डिग्री मिळणार आहे.

शिक्षण घेत असताना कुठले पालक त्यांच्या पाल्यांनी मध्यातून शिक्षण सोडावे हि अपेक्षा करतात? यातून शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या हद्दपारीला संस्थागत रूप येण्याची दाट शक्यता आहे. एक व दोन वर्षाच्या पर्यायातून बरेच विद्यार्थी बाहेर पडण्याच्या रचनेला गती मिळेल व एक, दोन वर्षाच्या त्रोटक पद्धतीचे शिक्षण घेऊन शिक्षण सोडणे हा निर्णय ऐच्छिक ठरविला जाईल. या पद्धतीच्या सर्टिफिकेट आणि डिप्लोमाच्या ढाच्यात रोजगाराच्या एकूण उतरंडीत विद्यार्थ्यांना अगदी खालच्या थरातील रोजगाराच्या संधीचे पर्याय खुले राहतील? म्हणजे मोटार मेकॅनिक, प्लम्बर, इलेक्ट्रिशियन, फुलमाळी अशा व इतर अनेक क्षेत्रातील कमी दर्जाचा रोजगार उपलब्ध करून देणारे हे नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरण ठरणार का?

ग्रामीण भागातील उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थाच्या काही अंगभूत मर्यादा आहेत. जवळपास ९० टक्के महाविद्यालयाचे केवळ पारंपरिक पद्धतीनेच अध्ययन, अध्यापन, संशोधन करीत असतील तर नॅक संस्थेने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची कशी पूर्तता होणार हा खरा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन्ही घटक उच्च शिक्षणातील व तंत्रज्ञानातील बदल स्विकारण्याच्या मानसिकतेत नाहीत. परीक्षाभिमुख वृत्तीत हे वावरत असल्यामुळे कौशल्याभिमुख शिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण याकडे त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. ज्या जॉब ओरिएण्टेड व कौशल्याभिमुख शिक्षणाचा आग्रह धरला जातो ते देण्यासाठी आवश्यक असलेला तज्ज्ञ शिक्षक उपलब्ध नाही. उपलब्ध झाला तरी त्याचे वेतन व मानधन देण्याची आर्थिक कुवत महाविद्यालयाकडे नाही, तसेच अशा अभ्यासक्रमाची फी भरण्याची ऐपत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत नाही. अशा दुष्टचक्रात गुणवत्तेची समस्या कशी सुटेल? डॉ माशेलकर यांच्या पंचसूत्री नुसार ज्ञानाधारित समाजाच्या निर्मितीसाठी सर्जनशीलतेला पूरक राष्ट्रीय व्यवस्था, सर्वसमावेशक सर्जनशीलतेचे वातावरण, संस्थापक सर्जनशीलता, औधोगिक सर्जनशीलता आणि सर्जनशील दृष्टिकोन मानसिकता अशी पंचसूत्री चा अभाव राष्ट्रीय शैक्षणिक असल्याचे धोरणात जाणवते.

**भागः २**

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे आर्थिक विकास साथण्याचे व राजकीय स्वतंत्र मिळण्याचे शस्त्र आहे. मात्र राज्यातील काही अश्या विद्यापीठाच्या गोंधळा मुळेच कि काय ? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नव्या शिक्षण धोरणात विदेशातील १०० विद्यापीठांना भारतात आमंत्रण दिले असावे आता असे वाटू लागले।

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात परदेशी विद्यापीठांना भारतात आणण्याचा विचार चांगला असला तरी त्यात विद्यर्थी हिताचा विचार व्हावा अन्यथा देशात वर्गसंघर्ष आणि सामान्यांना शिक्षण नपरवडण्याचा धोका वाढूशकतो व पुढील काही वर्षात परदेशी विद्यापीठांची बेटे भारतात तयार होतील? शिवाय जागतिक दर्जाची किती विद्यापीठे भारतात येतील हेही स्पष्ट ह्या धोरणत नाही. नवे शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतून शिक्षण घेणे सोपे जाणार, मात्र (मातृभाषेतून) मराठीतून शिकायचं म्हटलंतर इंगजीतून शिकणाऱ्या मुलांच्या तुलनेत आपली मुले मागे पडतील हे कडवट सत्य आहे. महाराष्ट्र पुरता बोलायचं म्हणजे मराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी या मराठी प्रेमींकडे बाजारू साहित्य संम्मेलना शिवाय दूसरे काहीही असा तोडगा नाही? इंग्रजी हि जागतिक ज्ञानाची खिडकी आहे. स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या आधुनिक मूल्य व्यवस्थेवर इंग्रजीत प्रचंड साहित्य आहे लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र यावर इंग्रजी एवढ लिखाण जगातील कोणत्याही भाषेत झालेलं नाही. आधुनिक ज्ञान विज्ञानाच्या सर्व शाखांवर इंग्रजीत अद्यावत ग्रंथ आहेत. संशोधनाची व संपर्काची भाषा इंग्रजीचे स्थान जगात अदिव्यतीय आहे. मराठी सारख्या भाषांना खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा करायचे असेल तर इंग्रजी मधील अद्यावत ज्ञान भांडार मराठीत आणण्यासाठी यंत्रणा उभीकरावी लागेल.

मेडिकल इंजिनियररिंग म्यानेजमेंट, कायदा, कला, वाणिज्य यातील सर्व प्रमुख ग्रंथ मराठीत भाषांतरित केले तरच प्राथमिक अडचण सुटू शकते. महाराष्ट्रातील विद्यापीठे एकत्रित येऊन हे कार्य सहज करू शकता. असे केलेतर मातृभाषा बोलल्या जाणाऱ्या खेड्यापाड्यातील शेकडो विद्यच्यर्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून शिकवता येईल. अंधश्रद्धा, जुन्या चालीरीती, जातीभेद हे सगळे संपुष्टात येईल व नवा भारतीय समाज निर्माण होईल. परंतु केंद्र शासनास हे नको आहे का ?



**ॲड. डॉ. सागर शंकरराव शिल्लेदार**
**किनवट, जि. नांदेड . ९४२१७६४६९९**

## नागरिकांनो पाणी जपून वापरा

**नांदेड, दि. ०५ मे-**

नांदेड जिल्ह्याचे तापमान ४३ अंशाच्यावर गेले आहे. त्यामुळे पाण्याच्या पातळीमध्ये झपाट्याने घट होत आहे. परिणामी मे महिन्यामध्ये पाणी टंचाईला सामोरे जाण्यांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. शनिवार २६ एप्रिल, २०२५ रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पाणी टंचाई आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीमध्येल निवासी उपजिल्हाजधिकारी महेश वडदकर, पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता अजय दाभाडे, कार्यकारी अभियंता चौगले, जिल्हा प्रशासन अधिकारी गंगाधर इरलोड, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, मनपाचे प्रतिनिधी इतर अधिकारी उपस्थित होते. तसेच व्हीसीव्दारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, नगर परिषदचे मुख्याधिकारी हे सहभागी होते. सध्या मानार प्रकल्पात ४६ टक्के, विष्णुपूरी प्रकल्प ३१ टक्के, मध्यम प्रकल्प २९ टक्के, उच्च पातळी बंधारे ३६ टक्के, लघु प्रकल्प १९ टक्के पाणी साठा शिल्लक असून हा साठा माहे जून अखेरपर्यंत पुरेसा आहे. परंतु जून मध्ये पर्जन्यमान कमी झाल्यास टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सध्या जिल्ह्यात १४ टँकर व ९१ विहीर अधिग्रहणाव्दारे पाणी पुरवठा चालू असून आणखी ६ टँकर व १९७ विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव मंजुरीच्या स्तरावर आहेत. नळ योजना दुरुस्ती २१५ प्रस्ताव, पूरक नळ योजना ६६ व नविन विंधन विहीर ७४० अशा विविध योजनांना प्रशासकीय मान्याता देण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. मुखेड तालुक्यामध्ये वाडी तांडयावर टँकर व विहीर अधिग्रहणाची संख्या जास्त असल्यामुळे जल जीवन मिशनची कामे तात्काळ पूर्ण करुन टंचाईग्रस्तॅ वाडी/ तांडयावरील टंचाईची समस्या मिटवावी तसेच जलयुक्त शिवारची कामे हाती घ्यावीत, अशा सुचना संबंधित विभागास जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिल्या आहेत.



















